लोकमत
हॅलो अमरावती
दि: 08.08.2025

# महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
# उप-प्रादेशिक कार्यालय, अमरावती-१

## पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीची सुचना

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी त्यांच्या प्रस्तावित २० रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याबाबत मंडळाकडे अर्ज सादर केला आहे. सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्लीचे १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिनियमान्वये व ०१ डिसेंबर, २००९ च्या सुधारित अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

प्रकल्प प्रवर्तकाच्या विनंतीस अनुसरून सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक बाबींबाबत घेण्यात येत असुन सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करणा-या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापीत होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावीत होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी टिका-टिपणी, अभिप्राय किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरूपात नोंदविता येईल.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती व्दारे जिल्हयाच्या संकेतस्थळावर **www.amravati.nic.in** या ठिकाणी District Survey Report प्रसिध्द करण्यात येईल.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक, सुचना, विचार,टिका-टिपणी, अभिप्राय तसेच आक्षेप ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत खालील पत्यावर नोंदविण्यात याव्यात किंवा या कार्यालयाच्या ई-मेलवर पाठविण्यात यावेत.

**उप-प्रादेशिक कार्यालय, अमरावती-१, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी, बापटवाडी, विवेकानंद कॉलनी, अमरावती. फोन नं. ०७२१-२५६३५९२/९३ email- sroamravati1@mpcb.gov.in roamravati1@mpcb.gov.in** तसेच मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुध्दा नोंदविता येईल.जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल.

**दिनांक - ०८/०९/२०२५ वेळ - दुपारी १.०० वाजता**

**स्थळ: बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.**

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

**१.** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई- ४०००२२ **२.** प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती - ४४४६०६ **३.** उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती-४४४६०६ **४.** जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती/ जिल्हा परिषद, अमरावती/ जिल्हा उदयोग केंद्र, अमरावती **५.** उप-विभागीय कार्यालय -मोर्शी/भातकुली /तिवसा/अचलपूर/ धामणगांव रेल्वे, जि. अमरावती. **६.** तहसिल कार्यालय - मोर्शी/भातकुली/तिवसा/अचलपूर/ धामणगांव रेल्वे, जि. अमरावती. **७.** कार्यकारी अधिकारी, नगर पंचायत- भातकुली, जि. अमरावती. **८.** ग्रामपंचायत कार्यालय- राजुरवाडी, ता. मोर्शी, जि. अमरावती, जवरा (फ)/फत्तेपुर /भारवाडी/उबंरखेड/धमंत्री, ता. तिवसा, जि. अमरावती, वाठोडा शुक्लेश्वर/ सौनारखेडा/भालसी/धनगरखेडा/पुर्णानगर, ता. भातकुली, जि. अमरावती, शहापुर - सावली (बु)/येसुर्णा- निंभारी ता. अचलपूर, जि. अमरावती बोरगांव निस्ताने/गोकुळसरा/ दिघीमहल्ले, ता. धामणगांव रेल्वे, जि. अमरावती.

सदर जनसुनावणी दिनांक ०८/०९/२०२५ रोजी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे रेतीघाटनिहाय घेण्यात येईल. (सदर जाहिरात मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या मान्यतेने प्रसिध्द करण्यात येत आहे.)

**स्वा/-**
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि. मंडळ, अमरावती-१ तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी.**